पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८. लेखा विभाग
क्र. लेखा/८/कावि/ ९७/२०१५
दिनांक :-१५/०७/२०१५

**विषय:- :- स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी करावयाच्या सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणाबाबत...**

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण दिनांक – २०/०७/२०१५ पासून किंवा त्यानंतरच्या नजीकच्या कालवधीस स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे पथकामार्फत करणेत येणार असलेबाबत त्यांनी पत्र क्र.स्था.१८/ब/पिं.चि.मनपा/मनपालेप/६२६, दिनांक - ०३ जुलै २०१५ चे पत्रान्वये कळविलेले आहे.

सदर लेखापरिक्षणाचे काम योग्य प्रकारे व सुरळीत पार पाडण्यासाठी लेखापरिक्षण पथकास आवश्यक सुविधा पुरविणे व लेख्यांच्या संबंधातील सर्व प्रमाणके, विवरणपत्रे, विवरण पत्रव्यवहार, टिपण्या किंवा इतर दस्तऐवज सादर करुन योग्य ते सहकार्य करावे.

तसेच लेखापरिक्षणास निदर्शनास आलेल्या आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करणेस प्राधान्य देणेत येणे बाबत संबंधितांना सुचना दिल्यास लेखापरिक्षणाचे कामकाज व्यवस्थित होऊन तद् नंतर होणारा पत्रव्यवहार कमी होईल. याबाबत दक्षता घेणेत यावी.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम ४ नुसार लेखापरिक्षणासाठी लेखे सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असून उक्त अधिनियमांचे कलम ६ नुसार दस्तऐवज सादर करण्यात संबंधीत व्यक्तीला हजर राहण्यास इत्यादी फर्मावण्याचा लेखापरिक्षकांस अधिकार असून कलम ६ अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षाणांस अभिलेख सादर न केल्यास कलम ७ नुसार र.रु २५,०००/- पर्यंत दंडात्मक कारवाईची तरतूद असून सदर कलमांबाबत दक्षता घेणेकामी सक्त ताकीद देणेत येत आहे.

तसेच लेखापरिक्षण सुरु झाल्यापासून एक आठवडयाच्या आत सर्व खाते प्रमुखांची बैठक घेणेत येणार असून लेखापरिक्षण पथकास सहकार्य करणेबाबत सुचना देणेत येतील व त्या बैठकी बाबतची विषयसुची पुढीलप्रमाणे असेल.

१) लेखापरिक्षण पथकाचा परिचय

२) लेखापरिक्षणाचे स्वरुप व व्याप्ती

३) महानगरपालिकेत अस्तित्वात असलेली कार्यपध्दती/ लेखांकन पध्दती व प्रमुख विभाग याबाबत सादरीकरण/माहिती

४) लेखापरिक्षण करावयाच्या वित्तीय वर्षात अंमलबजावणी झालेल्या/सुरु असलेल्या बाहय अनुदानित योजनांची माहिती

५) संगणकीकृत लेखे ठेवण्यास येत असल्यास संगणकीय प्रणालीची माहिती

तरी लेखापरिक्षणास लेखापरिक्षण विहित मुदतीत पुर्ण करणे शक्य व्हावे यासाठी सर्व अभिलेख, दस्तऐवज अदयावत पुरवून पथकास योग्य ते सहकार्य करावे. तसेच आपल्या अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांना योग्य त्या सुचना देणेत याव्यात.

तसेच सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणातील आक्षेपांची पुर्तता ज्या विभागांनी केलेली आहे त्या विभांगानी सदर चे लेखापरिक्षणांच्या वेळी पुर्तता केलेले आक्षेपांचे अनुपालन स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे पथकामार्फत करुन घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८.

प्रति,
सर्व विभागप्रमुख